International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.6 July–Aug. 2020

# कासेगावमधील देशमुखांची गढी

**डॉ. रविराज नामदेव कांबळे**
सहाय्यक प्राध्यापक
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय,पंढरपूर

**प्रस्तावना:**

गढी हा एक निधार्मिक स्थापत्याचा नमुना होय. अशा गढ्या साधारणतः परगण्याच्या ठिकाणी बांधल्या जात. साधारणतः परगण्याचे वतनदार देशमुख-देशपांडे अशा प्रकारच्या गढी बांधत असत. या गढी एकाच कुटुंबाच्या मालकीच्या असत. परगण्याचे वतनदार हे तालेवार असत त्यांना प्रशासकीय अधिकार होते. सामाजिक व आर्थिक वैभव होते. त्यामुळे त्यांना प्रतिष्ठा होती. त्यांना कांही प्रमाणात लष्कर सुद्धा बाळगण्याचे अधिकार होते. असा वतनदार इच्छा असली तरी सुद्धा ते किल्ले बांधू शकत नव्हते. कारण त्यामुळे राजसत्तेला आव्हान दिल्यासारखे झाले असते. तर दुसरीकडे वाडे बांधणे कमीपणाचे वाटत असे. मग अशा तालेवारांनी आपल्या निवासासाठी ‘गढी’ हा प्रकार निवडला आज आपल्या भागात अनेक गढी दिसून येतात. अशा गढीचे आता पर्यटनविषयक महत्व वाढू लागलेले आहे.

**कासेगावचा इतिहास:**

कासेगाव हे सोलापूर जिल्हयातील पंढरपूर तालुक्यातील प्राचीन आणि मध्ययुगीन ऐतिहासिक वारसा असणारे गाव आहे. निजामशाही,मोगलशाही, शिवशाही आणि पेशवाई इत्यादीच्या कालखंडात कासेगाव हे महत्वाचे ठाणे ठरले होते. विजापूरचा आदिलशहा ईर-माईल आदिलशहाने इ.स.१६२७ मध्ये शहाजी राजे यांच्या दुसऱ्या विवाह प्रसंगी सन्मानपूर्वक पागा व लोक ठेवण्यासाठी कासेगाव महाल बक्षीस दिल्याची इतिहासात नोंद आहे.[१] २१ नोव्हेंबर १६३७ च्या महंमद आदिलशहाने इ.स.१६७२ पर्यंत नाईकजी पांढरे हा कासेगावचा कारभारी होता इ.स. १६७२ मध्ये कासेगावची देशमुखी गोदाजी देशमुख यांचेकडे दिल्याचे उल्लेख मिळतात. इ.स.१६८६ पर्यंत कासेगाव आदिलशहाच्या वर्चस्वाखाली होते. इ.स.१६८६ ते १७४३ पर्यंत ते मोगलांच्या ताब्यात होते. इ.स. १७४३ ते १८१८ पर्यंत ते पेशव्यांकडे होते तर १० मे १८१८ ते १४ ऑगस्ट १९४७ पर्यंत ते ब्रिटीशांच्या वर्चस्वाखाली होते.[२] मोगल राजवटीमध्ये प्रशासनाच्या सोयीसाठी १८ सरकारे (जिल्हे) निर्माण केले होते. त्यामधील एक सरकार (जिल्हा) म्हणजे असदनगर (अकलूज) होय. याच असदनगर सरकारमध्ये १२ परगणे असून त्यातील १० वा परगणा म्हणजे कासेगाव परगणा होय.

कासेगाव परगण्यामध्ये ४२ गावे असल्याची नोंद पुणे पुराभिलेखागारमध्ये आहे. अखिल भारताची आध्यात्मिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे श्रीक्षेत्र पंढरपूर हे कासेगाव परगण्याच्या कक्षेत मांडले होते. विठ्ठलाचे वास्तव्य पंढरपूरमध्ये असल्यामुळे पंढरपूरला साधूसंताची फार मोठी परंपरा लाभली आहे. या परंपरेमुळे ही भूमी पावन झाली आहे.[३]

**कासेगावचे स्थान:**

कासेगाव हे सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यातील प्राचीन व मध्ययुगीन वारसा असलेले गाव आहे. सोलापूर पासून ७५ कि.मी. अंतरावर आणि पंढरपूर पासून ७ कि.मी अंतरावर आहे. कासेगावच्या पूर्वेस सिद्धेवाडी, अनवली, पश्चिमेस बोहाळी, मठवस्ती, टाकळी, दक्षिणेस तनाळी, तावशी, उत्तरेस टाकळी,पंढरपूर हि गावे आहेत.[४]

**गढीचा इतिहास:**

गढी म्हणजे सरदाराने रहावयाचे संरक्षित ठिकाण होय. गढी हा प्रकार जवळजवळ किल्ल्यासारखाच असतो. गढीच्या संरक्षणासाठी बाहेरच्या बाजूला उंच दगडी भिंत कांही वेळा विटांची तटबंदी, खंदक व भक्कम दरवाजे बांधलेले दिसतात मराठयांनी आपल्या राजवटीत अनेक गढ्या बांधल्या. बहुसंख्य गढ्या या १८ व्या शतकात बांधल्या.[५]

१७ व्या शतकात छत्रपती राजारामाच्या काळापासून जहागिरीची पद्धत पुनरुज्जीवित झाली. त्यामुळे अनेक सरदार उदयास आले. त्यांना दिलेल्या जहागिरीत त्यांनी आपल्या सोयीनुसार गढ्या बांधल्या. विशेषतः पहिला बाजीराव व नानासाहेब यांच्या कारकीर्दीत जहागिरी व जहागीरीदार यांची संख्या मोठ्या प्रमाणातवाढली. याबद्दल डॉ.माटे म्हणतात की, जहागिरदारींची वाढ झाल्यामुळे मोठया प्रमाणात लोकांना खेडी व शहरे यामध्ये रस निर्माण झाला. तसेच सोयीच्या दृष्टीने एखादे ठिकाण ताब्यात असण्याची आवश्यकता भासू लागली. त्यामधूनच अनेक गढ्यानिर्माण झाल्या. उदा.दरेकरांची, दरेवाडीची गढी, राझांची देशपांडयांची गढी, कांही गढ्या' आपल्या दुर्गमपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये जाधववाडीची गढी, वाघोलीची गढी,तासगांवची गढी विशेष प्रसिध्द आहे.[६]

महाराष्ट्रामध्ये अनेक सरदार, जहागिरदार आणि परगण्यांचे देशमुख यांनी आपापल्या कार्यक्षेत्रामध्ये राहण्यासाठी संरक्षित ठिकाण म्हणून किल्लेवजा गढी बांधलेल्या दिसून येतात. त्याचप्रमाणे कासेगाव परगण्यामध्ये तत्कालीन देशमुखांनी गढीबांधल्याचे दिसून येती तीच ही कासेगावच्या ऐतिहासिक गढी म्हणून ओळखली जाते.[७]

**कासेगावमधील देशमुखांची गढी:**

कासेगाव मध्ये असलेली देशमुखांची गढी ही मध्य युगीन काळात अत्यंत देखणी होती असे तिचे प्रवेशद्वार पाहिल्यावर वाटते ४०० वर्षपूर्वीचे प्रवेश आजही चांगल्या स्थितीत आहे. त्यावरूनच त्यावेळच्या बांधकामाचा भक्कमपणाचा अंदाज येतो. सध्या या गढीचा पाठीमागचा भाग पाडून आत बांधकाम केलेले आहे. परंतुआतील बांधकामाची ठेवण तशाच स्वरुपात ठेवलेली आहे. या गढीचा विस्तार ३० गुंठयामध्ये आहे.

**प्रवेशद्वार:**

या गढीला दोन प्रवेशद्वार आहेत. उत्तरेला मुख्य प्रवेशद्वार तर दक्षिणेला दुसरे प्रवेशद्वार आहे. मुख्य प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूना दोन डौलदार बुरुज आहेत. या बुरुजांवर जाण्यासाठी गढीच्या आतील भागातून जीना आहे. या गढीच्या प्रवेशद्वारालाअसणारी लाकडी चौकट फार जुनी असून त्यावर गणेश प्रतिमा कोरलेली आहे. प्रवेशद्वाराच्या वरील दगडी शिळेवरती गणेश कोरलेला आहे. ही गढी वतनदारांच्या राहण्याच्या रूपवाचे प्रतिनिधीत्व करताना दिसते.

**प्रवेशद्वार भिंतीची जाडी:**

गढीच्या प्रवेशद्वार व तटबंदीच्या भिंतीची रुंदी ही ४ फुटापर्यंत आहे. त्यामुळे आजही ही तटबंदी व प्रवेशद्वार दिमाखात उभे आहे. प्रवेशद्वारावरील वरच्या मजल्यावर जाणेसाठी दोन्ही बाजूंनी दोन अरुंद दगडी जिने आहेत. वरच्या बाजूला दोन्हीकडे व दरवाज्यावरती असे तीन झरोखे आहेत.

**घोडयांची पागा:**

मुख्य प्रवेशद्वारातून  प्रवेश केल्यावर ओसरी लागते त्याच्यापुढे आतमध्ये घोडयांची मोठी पागा दिसून येते. घोडयांना बांधण्यासाठी वापरलेल्या कडया अजूनही आहेत.

**अंबरखाना:**

गढीच्या आतील प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला तळघरे आहेत. या तळघरांचा वापर धान्य साठवण्यांसाठी केला जात होता. अंबरखान्याला दोन दरवाजे आहेत. सध्या ते दरवाजे बंद आहेत.

**गढीमधील मुर्ती :**

कासेगाव परगण्याचे देशमुख हे धार्मिक असल्याने गढी मध्ये त्यांनी मूर्तीची प्रतिष्ठापना केलेली होती. या गढीमध्ये दोन मुर्ती आहेत. एक शेषशाही विष्णू आणि दुसरी कृष्णाची मुर्ती आहे. त्या मुर्त्या तांब्याच्या धातूच्या आहेत. त्या मुर्त्यांची पूजा हे देशमुखांचे वारसदार परंपरागतरितीने करत आहेत.

**कालिका देवीचे मंदिर:**

कासेगाव परगण्यामध्ये देव-देवतांची मंदिरे आहेत. असे असले तरी  कासेगावचे देशमुख हे धार्मिक प्रवृत्तीचे असल्याने त्यांनी आपल्या गढी मध्ये कालिका देवीचे मंदिर बांधलेले आहे. या देवतेची ते परंपरागत पद्धतीने पूजा करत आहेत.

**तलवारी व शिक्के:**

कासेगाव परगणा हा ४२ गावांचा मिळून बनलेला होता. कासेगाव परगण्याचे देशमुखांचे वारस व त्याचे आप्तनातेवाईक यांच्याकडे अनेक शस्त्रास्त्रे आणि शिक्के सापडलेले आहेत. ते त्यांना त्यांच्या अधिकाराने मिळालेले आहेत. परगण्याचे देशमुख त्यांचे वारसदार वसंतनाना देशमुख व त्यांचे आप्तनातेवाईक यांच्या शस्त्रागृहामध्ये तलवारी आहेत.

**पाणीपुरवठ्याची सोय** :

गढी मध्ये रहानाऱ्या देशमुखांच्या आप्तनातेवाईकांना पाणीपुरवठा व्हावा या उदेशाने पाणीपुरवठ्याची सोय केलेली दिसून येते. गढीमध्ये पश्चिमेला एक आड आहे. त्यातून पाणीपुरवठ्याची सोय केलेली होती. तसेच पाण्याचा निचरा होण्यासाठी भुयारी गटार देखील होते. ते पाणी त्यातून गावाच्या बाहेर सोडले जाई.

**ओसऱ्या:**

गढीच्या प्रवेशद्वारातून आत प्रवेश केल्यानंतर प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला मोठया ओसऱ्या आहेत. या ओसऱ्या वर परगण्यातील खास लोकांच्या बैठक होत असत तसेच विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या कारभाराच्या बैठकही तिथे होत.

**सारांश:**

मराठेकालीन वारसा असलेली कासेगाव देशमुखांची गढी ही अतिशय वैशिष्टय पूर्ण आहे. या गढीला असणारे प्रवेशद्वार, बुरुज, घोडयाच्या पागा, अंबरखाना, देवतांच्या मूर्ती, अनेक तलवारी, शिक्के हे इतिहासाचे पुरावे देताना वास्तुशास्त्राच्या दृष्टीकोणातून गढीचे काम आकर्षक आहे. ही गढी देशमुखांच्या वास्तव्यासाठी बांधलेली होती. संरक्षणाच्या दृष्टीने कासेगाव परगण्याच्या गोंदाजी देशमुखापासून ते पेशवाईच्या अखेर पर्यंत आणि इंग्रजी राजवटीच्या पहिल्या दशकापर्यंत अनेक कर्तबगार विविध भूमिका पार पाडणारे देशमुख, देशपांडे हे वतनदार होऊन गेले. कासेगाव परगण्यामध्ये खुद्द देशमुखांनीच संरक्षणाच्या दृष्टीने गढी बांधलेली आहे. याबरोबरच त्यांनी अनेक इमारती, वाडे, कचेऱ्या, वेसी, अनेक मंदिरे बांधलेली आहेत. कर्तबगार, बहाद्दूर, मर्दमुखी याची निशाणी म्हणून तलवारी आणि शिक्के बाळगले आहेत.[८]

**संदर्भ:**

१) श्री. गोपाल देशमुख, सोलापूर जिल्ह्याची बखर, रेवू प्रकाशन, पंढरपूर-१९८१, पृ.३.

२) श्री.ग.ह.खरे एतिहासिक फारसी साहित्य प्रकाशन, भा.इ.स.मं.पुणे, खंड प्रभाग-२, १९६९.

३) श्री. प्रा.रविराज नामदेव कांबळे, “कासेगाव परगण्याचा सामाजीक व आर्थिक इतिहास” (१७४० -१८००) अप्रकाशीत पी.एचडी.प्रबंध, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर मे २०१६. पृ-४ .

४)प्रा.डॉ.सौ.जयश्री ज्ञानदेव रणनवरे पंढरपूरचे सांस्कृतिक वैभव अक्षरलेणे प्रकाशन सोलापूर,२००६.पृ-३३१.

५)डॉ.अरुण चंद्र पाठक महाराष्ट्रातील कला व स्थापत्य कला, श्रीराम पब्लिकेशन पुणे, पृ-४२०.

६)डॉ.दीपा साळवे/मोरे मराठयांचा इतिहास एज्युकेशनल पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रीब्युटर्स,औरंगपुरा,औरंगाबाद,जून -२०१३, पृ-५८५.

७)डॉ.बी.एन.सरदेसाई,मराठयांचा सामाजीक व आर्थिक व सांस्कृतिक इतिहास १६०७- १८१८ फडके प्रकाशन कोल्हापूर मार्च -२००१, पृ-२८८.

८)प्रा.डॉ.कांबळे पूर्वोक्त.